| | |
|---|---|
| | **किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५५/२०२५.**<br>**श्रीमती सुशिला बाबुराव पाटील वगैरे**<br>विरुध्द<br>कोणी नाही. |

# <u>निशाण १ खाली आदेश</u>

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट,१८२७ चे कलम (२) प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी केला आहे.

०२. <u>अर्जदारांची अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे</u>

अर्जदार यांचे मुळ पुरुष गणपती आबा पाटील हे मयत असून त्यांची पत्नी देखील मयत आहे. त्यांना बाबुराव,राजाराम व रामचंद्र असे तीन मुलगे असून आक्काताई ही मुलगी आहे. बाबुराव हा मयत असून त्यांस अर्जदार क्र.१ (अ) ते १ (क) आणि अर्जदार क्र. २ व ३ हे वारस आहेत. तसेच मुलगी आक्काताई ही दि. २५.१०.२०१४ रोजी अविवाहित मयत झाली आहे. त्यामुळे मयत आक्काताई हिला तिचे मृत्यु पश्चात वर्ग- १ मधील कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वर्ग- २ प्रमाणे सरळ कायदेशीर वारस आहेत.

०३. प्रस्तुत अर्जदार हे मुळचे देवाळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील राहणारे आहेत. अर्जातील कलम १ मध्ये नमुद केलेल्या मौजे देवाळे ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर या मिळकती अर्जदार यांच्या वाडवडिलार्जित असून मयत आक्काताई गणपती पाटील हिचे हिस्सेस तिचे पश्चात सदर मिळकतीस अर्जदार क्र.१ (अ) ते १ (क), २ व ३ हे एकमेव सरळ वारस आहेत. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये मयत आक्काताई गणपती पाटील हिचे हिस्सेस नोंद असणारे क्षेत्र तिचे पश्चात अर्जदार यांना सदर मिळकतीचे मालकी संदर्भात वारस नातेने मयताचे कायदेशिर सरळ वारस असलेबाबत प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायद्यातील तरतुदीप्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी अर्ज केला आहे.

०४. अर्जाच्या अनुशंगाने नि.६ कडील जाहिरनामा मयताचे घरावर तसेच एक प्रत गाव चावडीचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली असून बेलीफ अहवाल ऑन लाईन सामील करणेत आलेला आहे. सदर कामी इतर कोणीही हजर होवून हरकत घेतलेली नाही. तसेच अर्जाच्या अनुषंगाने तरुण भारत या वृत्तपत्रात दिनांक १६.०१.२०२६ रोजी जाहिरनामा प्रसिध्द केला

आहे. सदर जाहिर नोटीस दैनिक अंकाची प्रत ही ऑन लाईन निशाणी क्र.१४ वर हजर केली आहे. जाहिरनामा प्रसिध्द झाल्यानंतर आजपर्यंत कोणीही अर्जदारच्या अर्जास हरकत नोंदवली नाही.

**०५.** अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार क्र. १(ब) संजय बाबुराव पाटील यांनी स्वतःचे सरतपास शपथपत्र ऑनलाईन अनुक्रमांक नि.१७/क कडे स्वतःकरिता व इतर अर्जदारांकरिता दाखल केले आहे. अर्जदार यांनी त्याचे पुराव्यामध्ये अर्जातीलच मजकुराचा पुर्नरुच्चार केला आहे. सदर साक्षीदाराने अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत त्यामुळे सदरचा वारसा दाखला अर्जदार त्याचे नांवे देणेत यावा असे कथन केले आहे.

**०६.** अर्जदाराने त्यांचे कथनाचे पृष्टर्थ मयत आक्काताई गणपती पाटील व मयत बाबुराव गणपती पाटील यांच्या मृत्यू दाखल्याची मुळ प्रत ऑनलाईन निशाणी क्र. नि.१५ व निशाणी क्रमांक १६/क ला हजर केली. तसेच ऑनलाईन_अर्जदार क्रमांक अर्जदार यांचे आधार कार्डची प्रत ऑनलाईन हजर केली. अर्जदार यांनी निशाणी १८ ला तोंडी पुरावा संपलेबाबतची पुरसीस दाखल केली .

**०७.** अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराने दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जातील सर्व कथनांचा पुर्नउच्चार केल्याचे दिसून येते. तर नि. क्र. १५ व १६ वरील मृत्यू दाखल्यावरुन आक्काताई गणपती पाटील व बाबुराव गणपती पाटील हे मयत झाल्याचे दिसून येते. तसेच दाखल केलेल्या वर्तमानपत्रावरुन जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिसते. परंतु सदर जाहीर नोटीस व जाहीरनामा प्रसिध्द करुनही प्रस्तुत प्रकरणात कोणी हजर झाले नाही. तसेच अर्जदार यांनी ते मयत आक्काताई गणपती पाटील यांचे वारस असलेबाबत वारसा दाखला मागणेसाठीचा अर्ज केलेचे स्पष्ट होते. एकंदरीत अर्जाचा विचार करता मयत आक्काताई गणपती पाटील ह्या अविवाहित मयत झाल्या असून त्यांना अर्जदार हेच सरळ व कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, सदरचा अर्ज मंजूर करण्यास कोणताही अडथळा येत असल्याचे दिसत नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## <u>आ दे श.</u>

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार **अर्जदार क्र.१ (अ) ते १ (क), २ व ३** हे मयत आक्काताई गणपती पाटील हिचे सरळ कायदेशीर वारस आहेत असा दाखला देण्यात यावा.

०३. प्रस्तुतचा वारसा दाखला अर्ज हा अर्जात नमुद कारणासाठी मंजूर करण्यात येतो.

०४. सदरचा वारसा दाखला योग्य तो न्यायालयीन मुद्रांक शुल्क घेणेत येवून निर्गमीत करण्यात यावा.

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.04.07 15:19:09 +0530

ठिकाण-पन्हाळा.
दिनांक- ०७.०४.२०२६.

एस.व्ही.जंगमस्वामी,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,पन्हाळा.
जि.कोल्हापूर